# तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे ४११ ०१६

दूरध्वनी क्र.(०२०) २५६५६२३४ E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in


**(कालमर्यादा : ३०.०४.२०१९ )**

जा.क्र . विकापु/लले/गोप/वागोअ/२०१८-१९/५२
दिनांक :- ३०.३.२०१९

# परिपत्रक

विषय :- वार्षिक गोपनीय अहवाल २०१८ - २०१९ बाबत ...

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२१०/प्र.क्रं.४७/२०१०/तेरा दिनांक ०१/११/२०११

२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीएफआर १२११/प्र.क्रं.२१७/२०१०/तेरा दिनांक १७/१२/२०११

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर १२११/प्र.क्र. २५७/तेरा दिनांक ०२.०२.२०१७

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा दिनांक ०७.०२.२०१८

५. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक विकापु/लले/वागोअ/२०१८-१९/३९ दिनांक २५.०२.२०१९

६. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्रमांक १(२) /तंशिसं/कार्यमूल्य.अहवाल/२०१८-१९/३७ दिनांक २७.०३.२०१९

उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ अन्वये विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांमधील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचा-यांचे सन २०१८-१९ चे कार्यमूल्यमापन अहवाल/गोपनीय टिपण लिहण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापी सदर परिपत्रकामध्ये राजपत्रित अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या नव्हत्या.

आता उपरोक्त संदर्भ क्रमांक ६ अन्वये संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांनी दिलेल्या सूचना आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहेत. त्यानुसार राजपत्रित अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाबाबतची कार्यवाही करावयाची आहे.

१. मागील वर्षाप्रमाणे या वर्षी देखील राजपत्रित अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही ही ऑफलाईन पध्दतीनेच करावयाची आहे.

२. शासकीय महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य कार्यरत नसतील तर त्या महाविद्यालयातील कार्यरत विभागप्रमुख/प्राध्यापक यांचे कार्यमूल्यमापन अहवाल संचालनालयाच्या स्तरावर प्रतिवेदन व पुनर्विलोकनासाठी सादर करण्यात यावेत. सदर कार्यमूल्यमापन अहवाल श्री. प्रमोद नाईक, सहसंचालक , तंत्रशिक्षण हे प्रतिवेदित करतील व डॉ. अभय वाघ, संचालक हे पुनर्विलोकीत करतील असे संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर निश्चित करण्यात आलेले आहे. तरी त्यानुसार संबंधित अधिका-यांच्या कार्यमूल्यमापन अहवालावर प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी नमूद करण्यात यावेत.

३. संचालनालय स्तरावर प्रतिवेदित करावयाचे कार्यमूल्यमापन अहवालाचे कोरे नमुने दिनांक ०६.०४.२०१९ पर्यंत व संचालनालय स्तरावर पुनर्विलोकीत करावयाचे कार्यमूल्यमापन अहवाल दिनांक २०.०४.२०१९ पर्यंत या

कार्यालयास सादर करण्यात यावेत. ज्या अधिका-यांचे कार्यमूल्यमापन अहवाल संचालनालय स्तरावर प्रतिवेदित करावयाचे आहेत. त्यांचेबाबतीत संबंधित प्राचार्यांनी सोबत कार्यमूल्यमापन अहवालाचे कच्चे टिपण जोडावे.

४. वित्त विभागाच्या दिनांक १२.०९.२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये विहित केलेल्या तरतुदीनुसार सन २०१८-१९ च्या कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही दिनांक ३०.०६.२०१९ पर्यंत पूर्ण न झाल्यास दिनांक १ जुलै रोजी देय असलेली वार्षिक वेतनवाढ कार्यमूल्यमापन अहवालाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांना मंजूर करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

५. कार्यमूल्यमापन अहवाल/गोपनीय अहवाल प्रतिवेदित व पुनर्विलोकन करतानाच काळजीपूर्वक शेरे नोंदविले जातील याची दक्षता प्रतिवेदन तसेच पुनर्विलोकन अधिकारी यांनी घ्यावयाची आहे.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०.१०.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सांख्यिकी गुणांकनामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. तरी कार्यमूल्यमापन अहवालाच्या गुणांकनाची प्रतवारी ही त्यानुसारच नोंदविली जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

७. सर्व कार्यमूल्यमापन अहवाल वर निर्देशित केलेल्या तारखेपर्यंत निम्नस्वाक्षरीकारांना सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

( डॉ. दिलीप नंदनवार )
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :

१) संचालक , अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
२) प्राचार्य , शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड
३) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी
४) प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड
५) शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / सोलापुर / कोल्हापूर / कराड /मिरज /अवसरी
६) प्राचार्य, शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन, तासगांव,
७) प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
८) प्राचार्य, महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
९) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे

प्रोग्रॅमर, संगणक विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे , यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.